आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

२१ फेब्रुवारी २०२६ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- ट्रंप प्रशासनाने लावलेल्या आयातशुल्काविषयी अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निवाड्याची केंद्रसरकारकडून दखल; परिणामांचा बारकाईने अभ्यास करण्यात येणार

- येत्या पाच वर्षांत भारत आणि ब्राझीलमधला द्विपक्षीय व्यापार २० अब्ज अमेरिकी डॉलरच्या पलीकडे नेण्याचा प्रधानमंत्र्यांचा विश्वास

- मन की बात या कार्यक्रमाद्वारे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या देशवासियांशी संवाद साधणार

- कर्नाटक आणि मध्यप्रदेशात झालेल्या वेगवेगळ्या अपघातात ९ जणांचा मृत्यू

**आणि**

- ऑस्ट्रेलियाविरुद्धची महिला टी ट्वेंटी क्रिकेट मालिका भारताने २-१ नं जिंकली

**<><><><><>**

अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयानं ट्रम्प यांनी जगभरातल्या देशांवर लादलेलं शुल्क असंवैधानिक असल्याचा निर्णय दिल्यानंतर, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जागतिक पातळीवर १० टक्के आयात शुल्क लागू करण्याचा आदेश जारी केला आहे. या आदेशावर ट्रम्प यांनी स्वाक्षरी केली असून, तो तातडीनं लागू होणार आहे. भारतासह जगभरातल्या इतर देशांसाठीही हा आदेश लागू असेल. या आदेशामुळे भारतावरचं आयात शुल्क तात्पुरत्या स्वरूपात १० टक्क्यांपर्यंत खाली येईल असा खुलासाही ट्रम्प यांच्या प्रशासनानं केला आहे.

**<><><><><>**

ट्रंप प्रशासनाने लावलेल्या आयातशुल्काविषयी अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निवाड्याची दखल केंद्रसरकारने घेतली असून त्याच्या

परिणामांबाबत बारकाईने अभ्यास करण्यात येत आहे. केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने प्रसिद्ध केलेल्या पत्रकात म्हटलंय की ट्रंप यांनी या निवाड्याबाबत पत्रकारपरिषद घेऊन काही घोषणा केल्या आहेत, त्याही विचारात घेतल्या आहेत.

**<><><><>**

अमेरिकेतल्या सर्वोच्च न्यायालयाच्या निवाड्याची वाट न पाहता घाईने व्यापार करार का केला,  असा सवाल काँग्रेसने उपस्थित केला आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी म्हटलंय की न्यायालयाच्या निर्णयाची वाट न पाहता भारताने अमेरिकेला जास्त व्यापार सवलती दिल्या आहेत. आता या कराराचा पुनर्विचार करावा आणि कोणत्याही दबावाविना उचित करार करावा अशी मागणी त्यांनी केली आहे.

**<><><><>**

येत्या पाच वर्षांत भारत आणि ब्राझीलमधला द्विपक्षीय व्यापार २० अब्ज अमेरिकी डॉलरच्या पलीकडे नेण्याचा विश्वास प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि ब्राझीलचे राष्ट्राध्यक्ष लुईझ इनासिओ लुला दा सिल्वा यांच्यात आज नवी दिल्ली इथं द्विपक्षीय चर्चा झाली. त्यानंतर दोन्ही नेत्यांनी संयुक्त निवेदन दिलं, त्यावेळी ते बोलत होते. ब्राझील हा लॅटिन अमेरिका प्रदेशातला भारताचा सर्वात मोठा व्यापारी भागीदार असल्याचंही त्यांनी सांगितलं.

**होल्ड बाईट - Modi Brazil Trade (१७ सेकंद)**

भारत आणि ब्राझीलच्या एकत्र काम करण्यानं ग्लोबल साउथ अंतर्गत येत असलेल्या देशांच्या अभिव्यक्तीला बळकटी आणि आत्मविश्वास लाभतो असं प्रधानमंत्री म्हणाले. दहशतवाद आणि दहशतवादाचे पाठीराखे मानवतेचे शत्रू आहेत, तसंच सध्याच्या काळातल्या आव्हानांचा सामना करण्यासाठी जागतिक संस्थांमध्ये सुधारणा होण्याची गरज आहे या मुद्यांवर दोन्ही देशांचं एकमत असल्याचंही ते म्हणाले.

प्रधानमंत्री आणि ब्राझीलच्या राष्ट्राध्यक्षांमध्ये झालेल्या द्विपक्षीय बैठकीत दोन्ही नेत्यांनी परस्परांमधील द्विपक्षीय संबंधांचा आढावा घेतला. व्यापार, ऊर्जा, संरक्षण, कृषी, हवामान कृती, तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, सेमीकंडक्टर्स, खनिजं आणि ग्लोबल साउथ अंतर्गतच्या देशांमधलं परस्पर सहकार्य अशा विविध क्षेत्रांमध्ये भारत आणि ब्राझीलमधली धोरणात्मक भागीदारी अधिक दृढ करण्यावर या बैठकीत चर्चा झाली असं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं म्हटलं आहे. यावेळी भारत आणि ब्राझीलमध्ये अत्यावश्यक खनिजं, डिजिटल सहकार्य, पारंपरिक ज्ञानाची देवाणघेवाण, आरोग्य, सूक्ष्म लघु आणि मध्यम उद्योग, उद्योजकता आणि जनसंवाद यांसह इतर क्षेत्रांशी संबंधित करारांना अंतिम रुप दिलं गेलं.

**<><><><><>**

उत्तर प्रदेशात एचसीएल-फॉक्सकॉन सेमीकंडक्टर सुविधेची स्थापना हे तांत्रिक स्वालंबनाच्या दिशेने टाकलेलं एक पाऊल असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी म्हणाले. उत्तर प्रदेशात यमुना एक्सप्रेस वे औद्योगिक विकास प्राधिकरण इथे एचसीएल-फॉक्सकॉनचा संयुक्त उपक्रम प्रकल्प असलेल्या इंडिया चिप प्रायव्हेट लिमिटेडचं उद्घाटन आज त्यांच्या हस्ते दूरस्थ पद्धतीने झालं, त्यावेळी ते बोलत होते. या प्रकल्पामुळे जागतिक चिपनिर्मिती परसंस्थेत भारताचं स्थान मजबूत होईल, असं मोदी म्हणाले.

देशातून निर्यात होणाऱ्या पहिल्या तीन वस्तुंमध्ये इलेक्ट्रॉनिक्स उपकरणांचा समावेश आहे आणि त्यात उत्तर प्रदेश सर्वात जास्त योगदान देणारं राज्य असल्याचं केंद्रीय माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले. नोएडा इथे उभारण्यात येणाऱ्या या प्रकल्पातून ३ कोटी ६० लाख चिप्स तयार होतील, असंही ते यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

भारत मंडपम इथं आयोजित इंडिया एआय इम्पॅक्ट एक्स्पो अर्थात भारतीय कृत्रिम बुद्धिमत्ता प्रभाव प्रदर्शनाचा आज समारोप झाला. ही शिखर परिषद आणि परिषदेच्या निमित्तानं जागतिक तंत्रज्ञान क्षेत्रातले आघाडीची व्यक्तिमत्वे आणि स्टार्टअप प्रतिनिधींसह शंभरपेक्षा जास्त देशांचे प्रतिनिधी, संशोधक, उद्योग क्षेत्रातले प्रतिष्ठीत व्यक्ती आणि धोरणकर्ते एकाच ठिकाणी आले होते. या प्रदर्शनाला उपस्थितांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. पाच लाखांपेक्षा जास्त लोकांनी या प्रदर्शनाला भेट दिली, तसंच विविध कार्यशाळा तसंच चर्चासत्रांमध्ये सहभाग नोंदवला.

**<><><><><>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज गुवाहाटी इथं केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाच्या ८७ व्या स्थापना दिनाच्या कार्यक्रमात सहभाग झाले. यावेळी त्यांनी पोलीस दलाच्या संचलनाचं निरीक्षण केलं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या, आकाशवाणीवरच्या मन की बात या कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधणार आहेत. हा या कार्यक्रम श्रृंखलेचा १३१ वा भाग असेल. सकाळी ११ वाजता प्रसारित होणारा हा कार्यक्रम आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्या, तसंच न्यूज ऑन ए आय आर ॲप वरुन ऐकता येईल.

**<><><><><>**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यकर्त्याने दाखल केलेल्या मानहानीच्या खटल्यासाठी काँग्रेस नेते राहुल गांधी आज ठाणे जिल्ह्यातल्या दंडाधिकारी न्यायालयासमोर हजर झाले. २०१४च्या लोकसभा निवडणुकीदरम्यान प्रचार सभेत राहुल गांधी यांनी संघाबाबत केलेल्या वक्तव्याबद्दल दाखल झालेल्या खटल्यात माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील जामीन होते. मात्र, गेल्या वर्षी त्यांचं

निधन झाल्यामुळे नवा जामीन सादर करण्याचे निर्देश भिवंडी दंडाधिकारी न्यायालयानं दिले. त्यानुसार, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी जामीन म्हणून अर्ज दिला. याप्रकरणी पुढची सुनावणी ४ एप्रिलला होणार आहे. दरम्यान राहुल गांधी यांनी आज मुंबईत पक्षाच्या कार्यकर्त्यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी महापालिका निवडणुकीतल्या पक्षाच्या कामगिरीचा तसंच राज्यात काँग्रेस पक्षाचं स्थान मजबूत करण्यासाठीच्या प्रयत्नांविषयीचा आढावा घेतला.

**<><><><><>**

कर्नाटकात बागलकोट जिल्ह्यात आज पहाटे झालेल्या अपघातात चौघांचा मृत्यू झाला असून इतर ८ जण जखमी झाले आहेत. जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. महाराष्ट्रातल्या ऊसतोडणी मजूरांना घेऊन जाणारं वाहन आज पहाटे बागलकोट जिल्ह्यातल्या जमखडी तालुक्यातल्या कट्टेकेरे इथं अचानक उलटून हा अपघात झाला. हे सर्व मजूर ऊसतोडणीसाठी जमखंडी परिसरात गेले होते.

**<><><><><>**

मध्य प्रदेशात भिंड जिल्ह्यामध्ये आज पहाटे बस आणि व्हॅनमध्ये झालेल्या अपघातात ५ जणांचा मृत्यू झाला तर सहा जण जखमी झाले. भिंड जिल्ह्यात राष्ट्रीय महामार्ग ७१९ वर छिमका या गावाजवळ पहाटे अडीच वाजण्याच्या सुमाराला हा अपघात झाला. ग्वाल्हेरहून भिंडच्या दिशेने भरधाव वेगाने जाणाऱ्या एका बसने समोरून येणाऱ्या व्हॅनला धडक दिली. त्यात पाच जण मृत्युमुखी पडले. दुर्घटनेत जखमी झालेल्यांना ग्वाल्हेर इथे हलवण्यात आलं आहे.

**<><><><><>**

ऑस्ट्रेलियामध्ये सुरु असलेल्या महिलांच्या टी ट्वेंटी क्रिकेट मालिकेतला एडलेड इथला आजचा शेवटचा सामना भारतीय महिलांनी १७ धावांनी जिंकला. यासह भारताने ही मालिका २-१ नं जिंकली. भारतानं प्रथम फलंदाजी करताना

निर्धारित २० षटकात १७६ धावा केल्या होत्या. त्याच्या प्रत्युत्तरादाखल ऑस्ट्रेलियाच्या संघाला ९ गडी बाद १५९ धावाच करता आल्या. भारतीय गोलंदाज श्रीयांका पाटील आणि श्री चरानी यांनी प्रत्येकी ३ बळी मिळवले. भारतातर्फे फलंदाजीत स्मृती मंधानानं ५५ चेंडूत ८२ तर जेमिना रॉड्रिक्सनं ४६ चेंडूत ५९ धावा केल्या.

**<><><><><>**

पाचव्या गोवा नौवहन संमेलनाचं उद्घाटन आज नौदलप्रमुख ऍडमिरल दिनेश त्रिपाठी यांच्या हस्ते झालं.  हिंद महासागराच्या किनाऱ्यावरल्या १४ देशांना या संमेलनाने एकत्र आणलं असून यामुळे या देशांसमोरच्या आव्हानांवर चर्चा करण्यासाठी व्यासपीठ मिळालं आहे, असं त्यांनी नमूद केलं. यावेळी त्रिपाठी यांनी नौवहन क्षेत्रात सहकार्याचं महत्त्व विषद केलं. विशाखापट्टणम इथं नुकत्याच झालेला ७४ देशांचा मेळावा हा सागरी महाकुंभ होता असं ते यावेळी म्हणाले. जगाचा ७० टक्के भूभाग हा पाण्याने आच्छादलेला असून जवळपास ६८ टक्के मालवाहतूक समुद्र मार्गे होते असं सांगत त्यांनी समुद्र मार्गाचं महत्त्व अधोरेखित केलं.

**//<><><><><>//**